स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेअंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी. पदवी करीता सादर करण्यात आलेल्या शोधप्रबंधाचा गोषवारा

विषय : **इतिहास**

संशोधन विषय

“गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास”

संशोधक

श्री. सुरेश नामदेव दांडगे

(सहा. प्राध्यापक)

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

ता. वाळवा, जि. सांगली

मो. नंबर - 9404881282

gmail : sdandge2011@gmail.com

संशोधन मार्गदर्शक

प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे

(विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक)

महात्मा फुले महाविद्यालय, अहमदपूर, जि. लातूर

मो. नंबर - 9923351678, 8830826234

gmail – babruwanmore@gmail.com

“गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास”

---

१९ व्या शतकात महाराष्ट्रातील समाज सुधारकांमध्ये गोपाळ गणेश आगरकरांचे महत्वपूर्ण स्थान राहिले आहे. आगरकरांनी हर्बर्ट स्पेन्सर, जॉन स्टुअर्ट मिल आणि ऑगस्त कॉम्ट या विचारवंतांचे ग्रंथ अभ्यासल्यामुळे त्यांच्यावर बुद्धिप्रामाण्यवाद, उदारमतवाद व विवेकवादाचे संस्कार झाले होते. त्यामुळे आगरकरांच्या सामाजिक सुधारणेच्या विचाराची जडणघडण विवेकवाद व बुद्धिप्रामाण्यवाद या दोन तत्वाच्या आधारे झाली. याच पाश्चात्य विचारवंताचे तत्वज्ञान आत्मसात करून त्यांनी समाजिक सुधारणेसाठी आपल्या कार्यातून शिक्षणाचे महत्व पटवून दिले होते. त्यांचे शैक्षणिक विचार तत्कालिन भारतीय परिस्थितीच्या संदर्भात सर्वसमावेशक होते. समकालीन इतर सामाजिक विचारवंतांपेक्षा त्यांचे विचार वेगळे व समाज हिताचेच होते. भारतातील सामाजिक व्यवस्थेतील जातीसंस्था, गुलामगिरी, अस्पृश्यता, कर्मकांड, ग्रंथप्रामाण्य आणि धार्मिक रूढी परंपरा इत्यादी विविध प्रकारच्या अनैतिक व्यवहारामुळे समाजाची प्रगती खुंटलेली होती. तसेच बालविवाह, स्त्रीदास्यत्व, सामाजिक अंधश्रद्धा, केशवपन, सतीप्रथा यासारख्या अनिष्ट चालिरीतींनी गांजलेल्या व मरणोन्मुख झालेल्या भारतात शिक्षणाशिवाय पर्याय नव्हता. मानसिक व शारीरिक क्षीणता, दारिद्रय आणि स्त्रियांची दु:खे दूर करण्यासाठी आगरकरांनी शिक्षणाचा आग्रह धरला होता. म्हणून नवसमाज निर्मितीसाठी शैक्षणिक विचारांचा अवलंब केला पाहिजे, असे आगरकरांचे मत होते.

आगरकरांचे आयुष्य केवळ १८५६ ते १८९५ म्हणजेच ३९ वर्षाचे होते. त्यातील २२-२३ वर्षे ही ज्ञानार्जन करण्यात गेली होती. आर्थिक परिस्थिती हलाखीची असली तरी इंदौरचे संस्थानिक शिवाजीराव होळकरांच्या ५०० रूपये महिना पगाराच्या नोकरीस नकार देऊन आगरकरांनी त्याकाळात द्रारिद्रयाशी सामना करत शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून देशसेवेला वाहून घेऊन एक वेगळा ध्येयवाद अनूसरला होता. त्यांनी सन १८८० मध्ये पुण्यात न्यु इंग्लिश स्कूलच्या स्थापनेत पुढाकार घेऊन खऱ्या अर्थाने शैक्षणिक कार्यास सुरूवात केली, याच शाळेमध्ये शिक्षक, फर्ग्युसन कॉलजमध्ये प्राध्यापक व प्राचार्य अशा पदावर काम करून

त्यांनी शैक्षणिक योगदान दिले होते. लोकमान्य टिळकांच्या मते आगरकरांनी आपल्या स्वार्थत्याग आणि तत्वनिष्ठा या सद्‌गुणांचा त्यांनी समाज हितासाठी उपयोग केला. बुध्दिप्रामाण्य, व्यक्तीस्वातंत्र्य, सामाजिक समता, स्त्री-पुरूष समानता, ऐहिक जीवनपध्दती आणि विज्ञाननिष्ठा या जीवनमूल्यांच्या आधारेच त्यांनी लोकशिक्षणाचा पुरस्कार करून समाज परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला होता.

आगरकरांनी आपल्या प्रगल्भ बुध्दीच्या जोरावर विवेकवादी, बुध्दिप्रामाण्यवादी, स्वतंत्रपणे व तात्विकदृष्टया मार्गदर्शन करून महाराष्ट्रातील लोकांच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनात नवयुग आणि नवचैतन्य उदयास आणले होते. प्रगत विचार, भौतिक विद्या आत्मसात केलेल्या सुधारकाच्या "इष्ट असेल ते बोलणार व साध्य असेल ते करणार" या विचारवाणीने महाराष्ट्राच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला. एक ध्येयवादी असलेल्या आगरकरांनी आपल्या अंगी असलेल्या असामान्य स्वार्थत्याग, दृढनिश्चय, आणि दुर्बल, भेकड, स्वार्थी बनलेल्या लोकांना प्रचंड आत्मविश्वासाने त्यांच्यात शैक्षणिक विचार रूजवून त्यांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच आगरकरांचे शैक्षणिक विचार भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. त्यांच्यावर झालेल्या संशोधनात त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक विचारावर फारसे संशोधन झालेले दिसत नाही. म्हणून गोपाळ गणेश आगरकरांच्या शैक्षणिक विचाराचा सखोल अभ्यास संशोधनाच्या माध्यमातून केला जाणार आहे.

संशोधनाची उद्दिष्टये

प्रस्तावित विषयाचे संशोधन करीत असताना खालील उद्दिष्टये समोर ठेवून विषयाची मांडणी करण्यात येईल.

१. १९ व्या शतकात रूढी-परंपरामुळे समाजाची अधोगती झाली होती.

२. अनिष्ट रूढी-परंपरा कायद्याव्दारे नाहीशा करण्यासाठी प्रबोधन करणे.

३. आगरकरांची विज्ञाननिष्ठ व विवेकवादी भूमिका मांडणे.

४. समाजातील जातीभेद व अस्पृश्यता नाहीशी करणे.

५. आगरकरांची शिक्षणातून समाज प्रबोधनाची भूमिका मांडणे.

६. आगरकरांचे शिक्षणविषयक कार्य व विचार मांडणे.

७. स्त्री-पुरूषांना समान व एकत्र शिक्षणाबाबतची आगरकरांची भूमिका मांडणे.

८. युरोपीयन स्त्री-पुरूषांप्रमाणे एकत्र शिक्षणाबाबतची आगरकरांची भूमिका मांडणे.

९. सक्तीच्या शिक्षणाबाबत आगरकरांची भूमिका मांडणे.

१०. आगरकरांचे स्त्री-पुरूष समानतेचे कार्य मांडणे.

परिकल्पना

प्रस्तावित विषयाचे संशोधन करताना उद्दिष्टांबरोबरच गृहितकेही महत्वाची असतात. त्यानुसार खालील गृहितके या संशोधन कार्यासाठी निश्चित करण्यात आली आहे.

१. आगरकर विवेकवादी व विज्ञाननिष्ठ समाजसुधारक होते.

२. रूढी-परंपराबाबत आगरकरांनी समाज प्रबोधन केले होते.

३. अनिष्ट रूढी-परंपरा कायद्याव्दारे नाहीशा कराव्या असे आगरकरांचे मत होते.

४. समाजातील जातीभेद व अस्पृश्यता नाहीशी करणे.

५. आगरकरांनी समाजिक प्रबोधनासाठी शिक्षणाचा मार्ग अनुसरला होता.

६. आगरकरांनी नोकरी न करता देशसेवेसाठी शिक्षण प्रसार केला.

७. युरोपीयन स्त्री-पुरूषासारख्या एकत्र व एकसारख्या शिक्षणपध्दतीचा पुरस्कार केला.

८. भारतीयांना सक्तीच्या शिक्षणाची आवश्यकता आगरकरांनी प्रतिपादन केली.

९. आगरकरांच्या शैक्षणिक कार्यातून स्त्री-पुरूष समानता प्रस्थापित झाली.

१०. आगरकरांच्या शैक्षणिक विचारामुळे सामाजिक पुनर्रचनेस सुरूवात झाली.

संशोधन विषयाची व्याप्ती व कालखंड

प्रस्तावित संशोधनात १८५६ ते १८९५ या काळातील “गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास” या संशोधन विषयाची मांडणी करण्यात येईल.

संशोधन पध्दती

प्रस्तावित विषयाचे संशोधन करताना उद्दिष्टे व गृहितकांच्या आधारे उपलब्ध असलेल्या अप्रकाशित, प्रकाशित प्राथमिक व दुय्यम संदर्भ साधनांचे अंतर्रग व बहिर्रंग परिक्षण करून संशोधन विषयाची मांडणी करण्यात येईल. तसेच समकालीन संदर्भ ग्रंथ तसेच मासिके, साप्ताहिके, नियतकालिके, वृत्तपत्रातील लेख, आणि इतर साधनांचा आधार घेऊन चिकित्सक पध्दतीने या विषयावर संशोधन करण्यात येईल.

संशोधन विषयाची निवड व महत्व

ब्रिटिशपूर्व काळात भारतात वेद, व्याकरण, धर्मशास्त्र, तर्कशास्त्राचे शिक्षण कनिष्ठ वर्गास नाकारून केवळ श्रीमंत वर्गाच्या मुलांना तसेच पेशवे, शिंदे, होळकर, पटवर्धन, दाभाडे आणि गायकवाड यासारख्या राजघराण्यातील स्त्रियांना पारंपारिक पध्दतीचे शिक्षण खाजगी पाठशाळामध्ये दिले जात होते. विशेषत: समाजातील शूद्र व अतिशूद्र हे शिक्षणापासून कायम वंचित राहिल्याने महाराष्ट्रातील ९५ टक्के समाज अशिक्षितच होता. सन १८१८ मध्ये पेशवाईचा शेवट होऊन ब्रिटिशांची आधुनिक शासन व्यवस्था महाराष्ट्रात सुरू झाली. आधुनिक व विज्ञाननिष्ठ शिक्षण घेतलेल्या समाज सुधारकांनी सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक प्रबोधन केले. त्यामध्ये गोपाळ गणेश आगरकरांचे नाव अग्रकम्राने घेतले जाते. आगरकरांनी आपले सर्व आयुष्य सामाजिक व शैक्षणिक प्रबोधन करण्यात व्यतित केले. आगरकरांच्या अथक सामाजिक व शैक्षणिक योगदानामुळे पाश्चात्यांनी केलेली भौतिक प्रगती, स्वातंत्र्य, मानवता, समानता यासारख्या आधुनिक तत्वांचे ज्ञान नवशिक्षित तरूणांनी आत्मसात केल्यानेच महाराष्ट्रास एक नविन दिशा मिळाली होती.

एकंदरीत शिक्षणाच्या अभावामुळे सबंध भारतात गुलामगिरी, स्त्रीदास्यत्व, सामाजिक अंधश्रद्धा, कर्मकांड आणि धार्मिक रूढी-परंपरा समाजमनावर खोलवर रूजल्या होत्या, या सामाजिक अनिष्ट रूढीपंरपंरा व चालीरिती नष्ट करण्यासाठी आगरकरांनी मांडलेल्या क्रांतिकारी सामाजिक व शैक्षणिक विचाराचा प्रभाव १९ व्या शतकात महाराष्ट्रातील समाजमनावर पडला होता. तर २१ व्या शतकाचा विचार केल्यास आजही समाजामध्ये जातीभेद, अस्पुश्यता, बालविवाह, संतती अनियमन यासारख्या अनिष्ट रूढी-परंपराचे अस्तित्व

दिसते. सन २०११ च्या जनगणनेनुसार पुरूष साक्षरतेचे प्रमाण ८८ टक्के तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण ७५ टक्के होते, म्हणजेच स्त्री आणि पुरूष साक्षरतेचे प्रमाण सारखे दिसत नाही. आगरकरांना अपेक्षित असलेली सामाजिक व शैक्षणिक विषमता नष्ठ झालेली दिसत नाही, आजचाच विचार केल्यास ज्याच्याकडे पैसा आहे तो महागडे शिक्षण घेतो तर सामान्याची परवड होताना दिसते. आज महाराष्ट्रात प्रचंड सामाजिक व शैक्षणिक बदल झाला असताना आगरकरांच्या सामाजिक व शैक्षणिक विचार व कार्याची अमंलबजावणी करणे गरजेचे वाटते. थोडक्यात समाजात समानता प्रस्तापीत होण्यासाठी एकत्र व समान शिक्षणाचा पुरस्कार आगरकरांनी केला होता. त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक विचारांना एक विशिष्ठ महत्व आहे, म्हणूनच आजही त्यांचे विचार समाजपयोगी वाटतात. अशा या उदारमतवादी, विवेकवादी बुध्दीप्रामाण्यवादी व समाजसुधारणेची तळमळ असलेल्या गोपाळ गणेश आगरकर यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानावर फारसे संशोधन झालेले दिसत नाही. म्हणून “गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास” या संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे.

प्रस्तावित प्रकरण रचना

“गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास” या प्रस्तावित विषयाचे संशोधन करताना खालीलप्रमाणे एकून पाच प्रकरणात संशोधन विषयाची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पहिले – प्रस्तावना

प्रस्तावित प्रकरणामध्ये संशोधन विषयाची प्रस्तावना करून संशोधन विषयाची निवड, संशोधनाचा कालखंड, संशोधनाची आवश्यकता, संशोधन विषयाचे स्वरूप, महत्व व व्याप्ती, संशोधन विषयाची मर्यादा, संशोधन विषयाची उद्दिष्टये, संशोधन विषयाची गृहितके आणि संशोधन पध्दतींची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण दुसरे – आगरकरांचे जीवनचरीत्र

प्रस्तावित प्रकरणामध्ये गोपाळ गणेश आगरकर यांचा जन्म व बालपण, शिक्षण, न्यु इग्लिश स्कुलची स्थापना, केसरी व सुधारक वृत्तपत्राची सुरूवात, आगरकरांची लोककल्याणाची भूमिका, आगरकर-टिळक मैत्री, आगरकर-टिळक मतभेद, फर्ग्युसन कॉलेजच्या प्राचार्यपदावरील कार्य, आगरकरांची वैचारिक जडणघडण आणि आगरकरांचे निधन यासारख्या विविध बाबींची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण तिसरे – आगरकरांचे सामाजिक सुधारणेबाबत योगदान

प्रस्तावित प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील अस्पृश्यता, जातीभेद, केशवपन, बालविवाह, सक्तीचे वैधव्य, बाल-जरठ विवाह, व्यसन व मद्यपान, मूर्तिपूजा, शिमगा सण, पशुहत्या, प्रेतसंस्कार, सोवळे ओवळे, ग्रहांची अनुकूलता, संमती वय, धर्मांतर, स्वर्ग, पुनर्जन्म इत्यादी रूढी परंपरामुळे समाजाची अधोगती झाली होती. त्यामुळे समाजातील जातीभेद व अस्पृश्यता नाहीशी करणे. सामाजिक प्रबोधनासाठी शैक्षणिक मार्गाचा आगरकरांनी पुरस्कार केला होता. तसेच समाजाच्या हितासाठी आणि सुधारणेसाठी त्यांनी सांगितलेले मार्ग उदा. लोकशिक्षण, प्रचलित कायद्याचा अवलंब करणे, नविन कायदे करणे, कायद्यात दुरूस्ती करणे. यासारख्या विविध बाबींची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण चौथे – आगरकरांचे शैक्षणिक सुधारणेबाबत योगदान

प्रस्तावित प्रकरणामध्ये १९ व्या शतकातील महाराष्ट्रातील शैक्षणिक स्थिती, आगरकरांनी देशाच्या भावी पिढीस स्वतंत्र व स्वावलंबी बनविण्यासाठी आणि त्यांचा बौध्दिक विकास करण्यासाठी शिक्षणाचे महत्व प्रतिपादन केले होते. आगरकरांचे शिक्षण विषयक कार्य, आगरकरांची विज्ञाननिष्ठ व विवेकवादी भूमिका, आगरकरांची प्राथमिक शिक्षणाबाबत भूमिका, स्त्री-पुरूषांना एकसारख्या शिक्षणाबाबतची आगरकरांची भूमिका, युरोपीयन स्त्री-पुरूषांप्रमाणे भारतीय स्त्री-पुरूषांना एकत्र शिक्षणाबाबतची आगरकरांची भूमिका, सक्तीच्या शिक्षणाबाबत आगरकरांची भूमिका, आगरकरांची शिक्षणातून समाज प्रबोधनाची भूमिका तसेच आगरकरांचे स्त्री-पुरूष समानतेच्या कार्याची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पाचवे – निष्कर्ष

“गोपाळ गणेश आगरकर यांचे सामाजिक व शैक्षणिक योगदान : एक चिकित्सक अभ्यास” या संशोधन विषयामध्ये पहिल्या प्रकरणात प्रस्तावना, दुसऱ्या प्रकरणामध्ये आगरकरांचे जीवनचरीत्र, तिसऱ्या प्रकरणात आगरकरांचे सामाजिक सुधारणेबाबत योगदान तर चौथ्या प्रकरणात आगरकरांचे शैक्षणिक सुधारणेबाबत योगदान या सर्व प्रकरणाच्या माध्यमातून आगरकरांनी केलेला स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार, नाकारलेली पुरूषप्रधान व्यवस्था, समाजाच्या नसानसात भिनलेली जातीव्यवस्था, सामाजिक अंधश्रध्दा, वृत्तवैकल्ये, धार्मिक कर्मकांड आणि अनिष्ट चालीरिती इत्यादीवर प्रहार करण्यासाठी त्यांनी मांडलेल्या क्रांतिकारी विचाराचे सार शोधून त्यांच्या मौलिक कार्याची मांडणी करण्यांत येईल.

संदर्भसूची :–

१. केसरी वृत्तपत्राचे सन १८८१ मधील निवडक अंक

२. केसरी वृत्तपत्राचे सन १८८२ मधील निवडक अंक

३. केसरी वृत्तपत्राचे सन १८८३ मधील निवडक अंक

४. केसरी वृत्तपत्राचे सन १८८४ मधील निवडक अंक

५. केसरी वृत्तपत्राचे सन १८८५ मधील निवडक अंक

६. केसरी वृत्तपत्राचे सन १८८६ मधील निवडक अंक

७. केसरी वृत्तपत्राचे चे सन १८८७ मधील निवडक अंक

८. सुधारक वृत्तपत्राचे सन १८८८ मधील निवडक अंक

९. सुधारक वृत्तपत्राचे सन १८८९ मधील निवडक अंक

१०. आगरकर गो. ग., डोंगरीच्या तुरूगांतील आमचे १०१ दिवस, सुधारक प्रिटिंग ब्युरो, पुणे.

११. अळतेकर मा. दा. गोपाळ गणेश आगरकर (चरित्र), वरदा बुक्स, पुणे, दुसरी आवृत्ती १९९३.

१२. अळतेकर मा. दा., संपूर्ण आगरकर, भाग २, मॉडर्न बुक डेपो, १९४९.

१३. सरदार गं. बा., आगरकरांचे सामाजिक तत्वविचार, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५.

१४. नातु. म. ग. व देशपांडे, दि. य., आगरकर—वाड़मंय, खंड १, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीक मंडळ, मुंबई, १९८४.

१५. देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, विद्या प्राकाशन, पुणे, १९८३.

१६. आगरकर गो. ग., केसरीतील निवडक निबंध, भाग १ पुणे, १९३७.

१७. बनहट्टी श्रीनिवास, टिळक आणि आगरकर, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, १९५७.

१८. केळकर न. चि., टिळक चरित्र—उत्तरार्ध, पुणे, १९२८.

१९. फडके य दि., शोध बाळ गोपाळांचा, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, २०००.

२०. प्रधान ग. प्र., संपा. आगरकर लेखसंग्रह, भाग १ दिल्ली, १९६०.

२१. प्रधान ग. प्र., संपा. आगरकर लेखसंग्रह, भाग २ दिल्ली, १९७१.

२२. परचुरे ह. ब., प्रिन्सिपॉल गो. ग. आगरकर, एम. ए. चरित्र, तत्वविवेचक छापखाना, मुंबई.

२३. गर्गे स. मा. गोपाळ गणेश आगरकर, नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९९१.

२४. कुंभार नागोराव, गोपाळ गणेश आगरकर—विचार दर्शन, प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९५.

२५. खांडेकर वि. स., आगरकर—चरित्र (व्यक्ती आणि कार्य), गणेश महादेव आणि कंपनी, पुणे, १९३२.

२६. शिखरे दा. न., सुधारक कर्ते आगरकर, कर्नाटक हाऊस चिराबाजार, मुंबई, १९५३.

२७. केळकर न. चि., लोकमान्य टिळक यांचे चरित्र, खंड पहिला, केसरी प्रकाशन, पुणे, १९२३.

२८. भावे अ. ह., संपूर्ण आगरकर, खंड २, वरदा बुक्स, पुणे, १९९५.

२९. देशपांडे सुनंदा, गोपाळ गणेश आगरकर, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९८३.

श्री. सुरेश नामदेव दांडगे

(सहा. प्राध्यापक)

आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, आष्टा

ता. वाळवा, जि. सांगली

मो. नंबर—९४०४८८१२८२

gmail : sdandge2011@gmail.com